# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ ७७/२०१४-१५/२९२ दिनांक : ३०/३/२०१५

**आदेश केस क्र. ७७/१४-१५**

| | |
|---|---|
| श्री. रामचंद्र गंगाराम खटाळे<br>पु. शिरोली, ता. हातकणंगले,<br>जि. कोल्हापूर. | अर्जदार |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर. | |
| २) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, शहर कोल्हापूर. | विरुध्द पक्षकार |
| ३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभागीय कार्यालय, मार्केटयार्ड, कोल्हापूर | |

**कोरमः-** १. श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव
२. श्री. पी. एस. बुरांडे, सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

**न्याय निर्णय**

श्री.जी.बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. रामचंद्र गंगाराम खटाळे, मु. पो. पुलाची शिरोली, ता. हातकणंगले यांनी वितरण कंपनी, शहर विभाग कोल्हापूर यांचेविरुध्द मंचाकडे दि. ३०.१०.२०१४ रोजी तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**<u>तक्रारीचे स्वरुप</u>**

श्री. रामचंद्र गंगाराम खटाळे, या नांवाने दिनांक ०८.०९.१९८२ पासून शेती वापरासाठी वीजेची जोडणी चालू आहे. जुन २००९ पासून मीटर क्र. ९०/३१९८७५७८ या मीटरने नोव्हेंबर २०१३ सालापर्यंत बीले दिलेली आहेत. तथापी सदरची बीले FAULTY /RNA अशा नावाखाली दिलेली आहेत. सदरची बिले मी भरलेली आहेत, तथापी, डिसेंबर २०१३ मध्ये मीटर क्र. ९०१९१८२१३६ हा मीटर बसविला त्या ही मीटरवरील बिले FAULTY /RNA या सदराखाली दिलेली आहेत.

दरम्यानच्या काळात कृषी वीजधारकांना दोन वेळा कृषी संजीवनी या योजनेतुन लाभ दिला गेला आहे. चुकीच्या पध्दतीने बील दिल्यामुळे मीटर असूनही ग्राहक म्हणून मजला न८ाहक जादा रक्कम भरावी लागली आहे. मार्च २०१४ मध्ये अशाच जादा देयकापोटी रक्कम रु. ५०००/- जमा केली आहे.

कृषि संजीवनी योजना २०१४ या योजनेचा लाभ मिळावा तसेच बिले दुरुस्त करुन मिळावीत म्हणून कंपनीच्या अधिकाऱ्याबरोबर पत्र व्यवहार केला आहे. तसेच कृषी संजीवनी योजना अंतर्गत कंपनीने सांगीतलेले हप्ते व चालू बील अशी रक्कम माझे हक्क शाबीत ठेवून म्हणजे UNDER PROTEST या सदराखाली भरलेली आहेत. याचसाठी दिनांक ३०-०८-२०१४ रोजी ʻ क्ष ʻ नमुयात तक्रार करुनही अद्यात तक्रारीचा निर्णय झालेला नाही. सबब, आपणापुढे अर्ज दाखल केला आहे. माझी आपणांस विनंती की, वर नमुद केल्याप्रमाणे २००९ सालापासून मी वापरलेल्या वीजेचे योग्य ते बील द्यावे, तसेच त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा दंड व व्याज लावू नये. दोन्ही वेळच्या कृषी संजीवनी योजनेचा लाभ मिळावा. जादा रक्कम व्याजासह परत मिळावी व झालेल्या मानसिक त्रासाबद्दल व खर्चाबद्दल योग्य ती रक्कम देण्याबाबतचे आदेश व्हावेत अशी विनंती आहे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. २७.०२.२०१५ रोजी घेण्यात आली. तक्रारदार प्रतिनिधी श्री. राजेंद्र कृष्णात खटाळे हे हजर होते. वितरण कंपनीतर्फे श्री. डी. पी. वाळींबे, उच्चस्तर लिपीक (लेखा), हे उपस्थित होते. सदर तक्रारीवरील लेखी निवेदन दि. ३१.१२.२०१४ रोजी मंचास सादर केले.

लेखी निवेदन खालील प्रमाणे ----

श्री. रामचंद्र गंगाराम खटाळे, शिरोली (पु), ता. हातकणंगले जि. कोल्हापूर ग्राहक क्र. १६७७८०९८८२८४/१ यांचे नांवावर शेतीपंप कनेक्शन १९८२ पासुन सुरु आहे. माहे जून २००९ पासून ग्राहकास मीटर क्र. ९०/३१९८७५७८ या मीटरनुसार रिडींगप्रमाणे बिले देणेत आलेली असून पावसाळयामध्ये पुराचे पाणी मीटरचे आजूबाजूला येत असलेमुळे रिडींग उपलब्ध होत नाही त्यामुळे या कालावधीत RNA/ LOCK बिले देणेत आलेली आहेत. त्याची जून २०१२ मध्ये रिडींग उपलब्ध झालेनंतर संगणक कडूनच बजावट देण्यात आलेली आहे. जुन २०१२ ची चूकीचे रिडींगचे देयक जूलै २०१२ मध्ये दुरुस्त करुन त्याची वजावट देण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे माहे मे. २०१३ ते नोव्हेंबर २०१३ या कालावधीतील FOULTY सरासरी देयके शाखा कार्यालय, शिरोली यांची अहवालानुसार दुरुस्त करण्यात आली असून त्याची वजावट नोव्हेंबर २०१३ मध्ये देण्यात आलेली आहे. **माहे ऑगस्ट २०१२ चे चुकीचे रिडींगची ४५५० युनिटची दुरुस्ती करण्यात आलेली असून त्याची (-) B-८० वजावट रुपये २६३६.५५ हे डिसेंबर २०१४ चे बीलामध्ये देण्यात येत आहे.**

माहे डिसेंबर २०१३ मध्ये मिटर बदलणेत आलेला असून त्याची सरासरी बीलाची वजावट संगणकाडून जानेवारी २०१४ मध्ये देण्यात आलेली आहे. तसेच मार्च २०१४ ते जुलै २०१४ या कालावधीतील फॉल्टी सरासरी देयकाची वजावट माहे ऑक्टोंबर २०१४ च्या बीलात देण्यात आलेली आहे. त्यामुळे ग्राहकाने अर्जात नमुद केलेल्या कालावधीतील RNA / FAULTY बीलाची वजावट त्या त्या वेळीस दुरुस्त करुन देण्यात आलेली आहे. कृषी संजीवनी २०१४ चा लाभ सर्व शेतीपंप ग्राहकांना मुख्य कार्यालयाकडून देण्यात येणार आहे.

सुनावनी दरम्यान ग्राहक प्रतिनिधी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे तक्रारीचे स्वरुप मंचासमोर सांगीतले. त्यावर वितरण कंपनीचे वतीने वरील लेखी निवेदनात नमुद केल्याप्रमाणे सविस्तर कथन मंचापुढे श्री. वाळींबे यांनी केले. तसेच सदर ग्राहकाचे सी.पी.एल. प्रमाणे देण्यात आलेली बीले तसेच RNA / FAULTY या प्रमाणे देण्यात आलेल्या बीलाची वजावट याची सविस्तर माहिती ग्राहकास तसेच मंचास दिली. तसेच सदर ग्राहकास त्यांच्या मागणीप्रमाणे कृषी संजीवनीचा लाभ नोव्हेंबर २०१४ चे बीलामध्ये दिलेला असल्याचे सांगीतले.

सुनावनीनंतर ग्राहकास त्यांच्या बीलाबद्दल असणाऱ्या सर्व शंकांचे निरसन करण्यासाठी उपविभागीय कार्यालयात बोलावून घेवून करण्याबाबत वितरण कंपनीला निर्देश देण्यात आले. त्याप्रमाणे ग्राहकाचे समाधान झाल्याचे त्यांनी कळविले.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाची तक्रारीचे निरसन झाल्यामुळे तक्रार निकाली काढणे योग्य होईल काय?

उत्तर : होय.

## <u>कारणमिमांसा</u>

सुनावणी दरम्यान वि.प.ने केलेल्या अभिकथनानुसार तक्रारदाराच्या तक्रारीची दखल घेवून योग्य ती बीले देण्यात आल्याचे निदर्शनास येते. तसेच ग्राहकास कृषी संजीवनी योजनेचा लाभ नोव्हेंबर २०१४ च्या बीलामध्ये दिल्याचे दिसुन येते. ग्राहकाच्या तक्रारीचे निरसन झाल्यामुळे सदर तक्रार निकाली काढणे योग्य होईल असे मंचाचे मत झाले आहे.

खालील प्रमाणे आदेश -

# <u>आदेश</u>

१. तक्रारदाराची तक्रार  निकाली काढणेत येत आहे.

२. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा.विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे  करता येईल.

दिनांक : (जी.बी. पानकर)<br>सदस्य सचिव

अध्यक्ष, पद दिनांक १६-१२-२०१४ पासुन रिक्त.

पी. एस. बुरांडे  :  सदस्य

एकमताच्या  आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.